# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दूरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुंनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DIsM-1 दि. 02.05.2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 07.05.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 11 /05/2020.

**विषय:- उस्मानाबाद जिल्हांतर्गत राज्य परिवहन महामंडळाची बस सेवा लॉकडाऊनचे कालावधीत बंद करणेबाबत.**

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण राज्यात लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 17 मे 2020 पर्यंत वाढविला आहे व लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. यातील मुद्दा क्र. 2 (i) नुसार ग्रीन, ऑरेंज व रेड (हॉटस्पॉट) झोनबाबत स्पष्टीकरण करण्यात आले आहे. तसेच मुद्दा क्र. 2 (ii) नुसार करोना (COVID-19) चा प्रादुर्भाव विचारात घेऊन जिल्ह्यातील रेड झोन (हॉटस्पॉट) व ऑरेंज झोन चा भाग निश्चित करणेबाबत अधिकार देण्यात आला आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 मधील मुद्दा क्र. 8 (i) नुसार ऑरेंज झोनमध्ये जिल्हांतर्गत व आंतरजिल्हा बस वाहतूकीस प्रतिबंध करण्यात आला असून उस्मानाबाद जिल्ह्यातील परंडा तालुक्यामध्ये करोना विषाणु (COVID-19) चा रुग्ण आढळून आलेला असल्यामुळे, करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून, संदर्भ क्र. 5 अन्वये उस्मानाबाद जिल्हांतर्गत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस सेवा सुरु करण्याकरिता देण्यात आलेली परवानगी रद्द करणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 अन्वये मला प्राप्त अधिकारांनुसार करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता लॉकडाऊनच्या कालावधीत दि. 17.05.2020 पर्यंत **उस्मानाबाद जिल्हांतर्गत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस सेवा बंद करणेबाबत आदेशित करीत आहे.**

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांका पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रति,**

**विभाग नियंत्रक, रा. प. उस्मानाबाद.**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
4. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
5. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
6. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
7. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
8. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

11/5/20

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner